पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३११७ दि. २८/०९ /२०१९**

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

## मोबाईल चोरी करणारा आरोपी जेरबंद.

तक्रारदार महीला नामे ऐश्वर्या रविंद्र शेरे, वय-२४ वर्षे, राहणार-शुभम अपार्टमेंट, निंबाळकर चौक, सदाशिव पेठ,पुणे-४११०३० या दिनांक-२७/०९/२०१९ रोजी राहाते निवासस्थानामध्ये झोपलेल्या असतांना यांतील आरोपी नामे शिवराम मल्लिकार्जुन पाटील, राहणार-२३७, मठपती गल्ली, अक्कलकोट, जिल्हा-सोलापुर याने निवासस्थानाचे अर्धवट उघडया असलेल्या दरवाजातुन घरात प्रवेश करुन फिर्यादी यांचे उशाजवळ ठेवलेला मोबाईल हॅण्डसेट चोरुन नेलेबाबत ऐश्वर्या रविंद्र शेरे, यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दिनांक-२७/०९/२०९ रोजी दुपारी १६-१५ वाजता विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर,गु.र.नं. ३३७/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल झालेला होता.

मा. स्वप्ना गोरे मॅडम, पोलीस उप आयुक्त सो.परिमंडळ-१, पुणेशहर, तसेच मा. सुधाकर यादव, सहाय्यक पोलीस आयुक्त सो.विश्रामबाग विभाग, पुणेशहर, यांचे मार्गदर्शनाप्रमाणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दादासाहेब चुडाप्पा, यांचे अधिपत्याखाली विश्रामबाग पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक श्री विष्णु देशमुख व पोलीस हवालदार सचिन सुपेकर यांनी सदर गुन्हयातील निष्पन्न आरोपी शिवराम मल्लिकार्जुन पाटील, राहणार-२३७, मठपती गल्ली, अक्कलकोट, जिल्हा-सोलापुर यास दिनांक २७/०९/२०१९ रोजी अटक करुन त्याचेकडुन गुन्हयातील चोरीस गेलेला मायक्रोमॅक्स कंपनीचा ८,०००/- रु. किंमतीचा मोबाईल हस्तगत करुन सदर गुन्हा उघडकीस आणलेला आहे.